॥ ॐ साईराम ॥

# प्रेमवाहिनी



मराठी अनुवाद

# प्रकरण - ११

# मूर्तिपूजा

मूर्तिपूजेची निंदा करणारे अनेक लोक आहेत. परंतु मूर्तिपूजेचे मूळ हे पिंडामध्ये ब्रह्मांड पाहण्याच्या मानवाच्या क्षमतेत आहे. मूर्तिपूजेची महती माणसाच्या कल्पनाशक्तीवर अवलंबून नाही, ती अनुभवाने सिद्ध झालेली आहे. ईश्वराच्या विराट स्वरूपामध्ये जे सापडते, ते सर्व शुद्ध, अन्यून असे मूर्तिस्वरूपात सुद्धा सापडते. मूर्तीचा उपयोग काव्यातील उपमा, रुपके इत्यादी प्रमाणे आहे. ते दृष्टांत, विस्तार यांच्या योगे स्पष्टीकरण करतात.

माणसाला आनंद वस्तूच्या आकृतीमुळे मिळत नाही, तर तिच्याशी प्रस्थापित झालेल्या संबंधामुळे मिळतो. मातेला कोणतेही मूल नव्हे, तर तिचेच मूल सुखी करते. प्रत्येकाच्या बाबतीत आणि सर्व वस्तूंसाठी हेच खरे आहे. विश्वातील प्रत्येक गोष्टीशी असे सख्यत्व, ज्यालाच ईश्वरप्रेम म्हणतात, प्रस्थापित केले तर किती अमर्याद आनंदाची अनुभूती होऊ शकते ! ज्यांनी अनुभवले आहे, फक्त त्यांनाच हे समजेल.